*“अमेरिकेत बायका पण पुरुषांचे केस कापतात न्हवं?” त्यानं माझं डोकं खाली दाबत मला विचारलं. माझा जबडाही त्यानं खालून पकडला होता, त्यामुळं मी फक्त एक साधारण होकारार्थी वाटेल असा आवाज काढू शकलो.*

*“मजा असंल!” तो म्हणाला. मी काही बोललो नाही.*

*“तिकडं कटिंगला किती पैसे घेतात?” अपेक्षित प्रश्न आला आणि मी सावध झालो. आता मी सांगितलेल्या डॉलरच्या आकड्याचं लगेच रुपयात रुपांतर झालं असतं आणि कटिंग करणाऱ्या लोकांची तिकडं चैन आहे असा निष्कर्ष निघाला असता. मग कदाचित अमेरिकेचा व्हिसा कसा काढता येतो, तिकडं येऊन दुकान टाकायला कायकाय लागतं यांच्या चौकशा सुरु झाल्या असत्या.*

अमेरिकेत शिकायला गेलेला तरुण पहिल्यांदाच भारतात येतो आणि केशकर्तनकाराकडं जातो, तेव्हाचा अनुभव सांगणारी विनोदी कथा.